सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९

# महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम, १९७९

(दिनांक ३ जुलै २००६ पर्यंत सुधारलेला)

**Maharashtra Act No. XXIX of 1979**

# The Maharashtra Tax on Buildings (with larger residential premises) (re-enacted) Act, 1979

(*As modified upto 3rd July 2006*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी मुद्रित आणि संचालक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले

२००६

[किंमत : रु. ८.०० ]

# सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९

# महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम, १९७९

**(दिनांक ३ जुलै, २००६ पर्यंत सुधारलेला)**

---

## अनुक्रमणिका


उद्देशिका.

कलमे. पृष्ठे

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. .. .. .. .. २

२. व्याख्या. .. .. .. .. २

**कर बसविणे व कर आकारणे**

३. विवक्षित इमारतींवर कर बसवणे व वसूल करणे. .. .. .. ४

४. कराची प्राथमिक जबाबदारी. .. ... .. .. ५

५. अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्ती जागेच्या भोगवटादाराकडून कराची रक्कम वसूल करण्यास पात्र असणे. .. ५

६. कलम ५ अन्वये रकमेची वसुली करण्याचे हक्क व उपाययोजना. .. .. ५

७. आकारणी प्राधिकाऱ्यांची नेमणूक. .. .. .. .. ५

८. इमारतींमधील करपात्र जागांची यादी तयार करणे व ती ठेवणे. .. .. ६

९. करपात्र जागांची आकारणी. .. .. .. .. ६

१०. आकारणी यादी व फेरबदलांची यादी प्रसिद्ध करणे. .. .. .. ७

११. अपील. .. .. .. .. .. ८

**कर वसुली**

१२. कर, इत्यादी वसूल करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी. .. .. .. ९

१३. ज्या इमारतींच्या संबंधात कर बसविता येईल त्या इमारतींवर कर हा भार म्हणून असणे. .. ९

१४. वसूल केलेली कराची रक्कम राज्य शासनाकडे जमा करणे आणि वसुली प्राधिकाऱ्याने कर वसुलीचे विवरण सादर करणे. .. ९

१५. कर वसूल करण्यात महानगरपालिकेने केलेली कसूर. .. .. .. १०

**संकीर्ण**

१६. प्रवेश, तपासणी वगैरे करण्याचा अधिकार. .. .. .. .. १०

१७. परतावे. .. .. .. .. .. ११

१८. परताव्यासाठी करावयाच्या मागण्यांची मुदत. .. .. .. ११

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १९. | कर भरण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | ११ |
| २०. | विवरण देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | ११ |
| २१. | खोटी निवेदने, वगैरे करण्याचा अपराध. | ११ |
| २२. | अडथळा आणल्याबद्दल शिक्षा. | १२ |
| २३. | कंपन्यांनी केलेले अपराध. | १२ |
| २४. | विवक्षित इमारतींना कर देण्यातून सूट देणे. | १२ |
| २५. | या अधिनियमाखालील कर हा, इतर करांच्या जोडीने असणे. | १३ |
| २६. | नियम करण्याचा अधिकार. | १३ |


## संक्रमणकालीन व विशेष तरतुदी


| | | |
|---|---|---|
| २७. | सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १९ याचे निरसन. | १३ |
| २८. | करपात्र जागांची यादी व कर आकारणी यादी तयार करणे आणि १९७४-७९ या कालावधीचा कर वसूल करणे. | १४ |
| २९. | या अधिनियमान्वये करपात्र नसणाऱ्या व्यक्तींना निरसित अधिनियमान्वये दिलेली रक्कम परत करणे. | १४ |
| ३०. | बिल किंवा परतावा आदेश बरोबर नसल्यास त्यास सुधारणा करण्याची तरतूद. | १४ |
| अनुसूची. | | १५ |

## सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.[1]

[महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम, १९७९.]

[दिनांक ६ सप्टेंबर, १९७९ रोजी राज्यपाल यांची अनुमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात,** भाग चार, असाधारण दिनांक १२ सप्टेंबर, १९७९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

या अधिनियमात खालील अधिनियमाअन्वये सुधारणा करण्यात आली :—

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ (२८-४-१९८९) †

**महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या इमारतींमध्ये अधिक मोठ्या निवासी जागा असतील अशा इमारतींवर कर बसवण्याबाबत तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

१९७४ चा महाराष्ट्र १९.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र निवासी जागांवरील कर अधिनियम, १९७४ यामध्ये, महानगरपालिका क्षेत्रातील ज्या निवासी जागांचे तलक्षेत्र बृहन्मुंबईत १२५ चौरस मीटरपेक्षा अधिक व इतर महानगरपालिका क्षेत्रात १५० चौरस मीटरपेक्षा अधिक आहे अशा निवासी जागांवर कर बसविण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे ;

**आणि, ज्याअर्थी,** मुंबई उच्च न्यायालयाने १९७८ चा किरकोळ विनंती-अर्ज क्रमांक २१४, रजब महाल सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादित विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर आणि इतर विनंती-अर्ज यांमध्ये, दिनांक २९ नोव्हेंबर व १ डिसेंबर, १९७८ रोजी असा निर्णय दिला की, या अधिनियमात कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रात कोठेही असलेल्या जागांसाठी कराच्या समान दराची तरतूद केली असल्याने, त्यामुळे भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४ चा भंग होतो आणि म्हणून तो रद्दबातल ठरतो ;

**आणि ज्याअर्थी,** राहण्याच्या उपलब्ध जागांच्या अमर्याद वापरावर नियंत्रण असावे, तीव्र टंचाई भासत असलेल्या अधिकाधिक निवासी जागा, दाट लोकवस्ती असलेल्या शहरांमध्ये उपलब्ध व्हाव्यात आणि असा कर बसवल्यानंतर बांधल्या जाणाऱ्या इमारतींमध्ये कोणतेही मोठे निवासी फ्लॅट्स किंवा जागा असणार नाहीत किंवा त्यांमधील त्यांची संख्या खूपच कमी असेल अशी या कराची काही उद्दिष्टे आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** इमारतींवरील हा कर राज्य शासनाचे महसुलाचे एक साधन असून त्याद्वारे लाखो रुपये वसूल करण्यात आलेले आहेत व ते परत करावे लागतील आणि महसुलाचे हे साधन व परिणामी राहण्याच्या जागांच्या वापराचे नियमन करण्याचा हा लाभ यापुढे उपलब्ध होणार नाही ;

**आणि, ज्याअर्थी,** सातत्य राखणे व त्या प्रयोजनासाठी रद्दबातल करण्यात आलेल्या अधिनियमाऐवजी उच्च न्यायालयाने निदर्शनास आणून दिलेल्या आणि त्या अधिनियमाच्या अंमलबजावणीत निदर्शनास आलेल्या दोषापासून मुक्त असा नवीन अधिनियम करणे आणि

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७९, भाग पाच, पृ. ३०२,३०३ (इंग्रजी) पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतींमध्ये मोठ्या निवासी जागा आहेत अशा इमारतींवर किंवा त्यांच्या भागांवर तलक्षेत्राच्या व करयोग्य मूल्याच्या आधारे, १ एप्रिल, १९७४ पासून, म्हणजेच महाराष्ट्र निवासी जागांवरील कर अधिनियम, १९७४ अन्वये ज्या दिनांकापासून कर बसवण्यात व वसूल करण्यात आला होता त्या दिनांकापासून भूतलक्षी प्रभावासह कर बसवणे व तो वसूल करणे, आणि विवक्षित आनुषंगिक व परिणामरूप तरतुदी करणे इष्ट आहे ; (१९७४ चा महाराष्ट्र १९.)

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम, १९७९, असे म्हणावे.

[१][(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे ;

(३) (क) तो प्रथमतः बृहन्मुंबई महानगरपालिका, पुणे, सोलापूर व कोल्हापूर शहरांच्या महानगरपालिका आणि नागपूर शहर महानगरपालिका या प्रत्येक महापालिका क्षेत्रामध्ये, दिनांक २९ एप्रिल, १९७४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(ख) राज्य शासनास, तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य शहराच्या किंवा शहरांच्या महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये आणि त्याद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून किंवा अशा दिनांकांपासून अंमलात आणता येईल ; आणि अशा वेगवेगळ्या क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता वेगळा दिनांक विनिर्दिष्ट करता येतील.]

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,---

(क) " अपील प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ११ अन्वये नेमलेला अपील प्राधिकारी, असा आहे ;

[२][(ख) " नेमलेला दिवस " याचा अर्थ,—

(एक) कलम १, पोट-कलम (३) च्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या महानगरपालिकांच्या संबंधात, **राजपत्रात** हा अधिनियम प्रसिद्ध झाल्याचा दिनांक ; आणि

(दोन) कलम १, पोट-कलम (३) च्या, खंड (ब) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे ज्यांच्या संबंधात हा अधिनियम अंमलात आणण्यात आला आहे अशा महानगरपालिकांच्या संबंधात अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीचा दिनांक ;

असा आहे ;

(ग) " करपात्र व्यक्ती " यात या अधिनियमान्वये ज्या व्यक्तीकडून कर किंवा इतर कोणतीही रक्कम देय असेल अशी व्यक्ती, व त्यामध्ये ज्या व्यक्तीच्या बाबतीत, तिने देय असलेल्या कराच्या आकारणीसाठी या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल अशा प्रत्येक व्यक्तीचा समावेश होतो ;

(घ) " आकारणी प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ७ अन्वये नेमलेला अधिकारी असा आहे ;

---

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ याच्या कलम २ (क) अन्वये पोट-कलम (२) ऐवजी समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ङ) " इमारत " यामध्ये, घर, उपगृह किंवा तशाच प्रकारच्या इतर कोणत्याही बांधकामाचा समावेश होतो, मग ते चिरेबंदी, सिमेंटचे किंवा विटांचे किंवा तशाच इतर सामग्रीचे असो– परंतु त्यामध्ये, गॅरेज किंवा नोकरांच्या वापरासाठी म्हणून असलेल्या व त्यांच्याकडून अशा प्रकारे वापरण्यात येणाऱ्या निवासस्थानाचा समावेश होत नाही ;

(च) " वसुली प्राधिकारी " याचा अर्थ कलम १२ अन्वये कर वसूल करण्याचा अधिकार देण्यात आलेला प्राधिकारी असा आहे ;

(छ) " महानगरपालिका क्षेत्र " याचा अर्थ संबंधित महानगरपालिका कायद्यान्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या हद्दीमधील क्षेत्र असा आहे ;

(ज) इमारतीतील कोणत्याही निवासी जागेच्या संबंधात " तलक्षेत्र " या शब्दप्रयोगाचा वापर करण्यात येईल तेव्हा त्याचा अर्थ, भिंतीची जाडी वगळून जागेचे एकूण तलक्षेत्र असा समजावा ;

(झ) " महानगरपालिका " याचा अर्थ संबंधित महानगरपालिका कायद्यान्वये प्रस्थापित करण्यात आलेली महानगरपालिका असा आहे ;

(ञ) " भोगवटादार " या संज्ञेमध्ये,—

(एक) जिच्या बाबतीत भाडे देण्यात येत असेल किंवा देय असेल अशा निवासी जागेच्या बाबतीत जी व्यक्ती त्यावेळी मालकास भाडे किंवा भाड्याचा कोणताही भाग देत असेल किंवा देण्यास पात्र असेल अशी कोणतीही व्यक्ती ;

(दोन) आपल्या निवासी जागेत राहणारा किंवा अन्यथा तिचा वापर करणारा मालक ;

(तीन) भाडेमाफ असलेला भाडेकरू ;

(चार) कोणत्याही निवासी जागेचा भोगवटा करणारा अनुज्ञप्तीधारक ; आणि

(पाच) कोणत्याही निवासी जागेच्या वापराबद्दल व तिच्या भोगवटयाबद्दल मालकास नुकसानभरपाई देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती ;

यांचा समावेश होतो ;

(ट) एखाद्या इमारतीमधील कोणत्याही निवासी जागेच्या संदर्भात " मालक " या संज्ञेचा वापर करण्यात येईल तेव्हा तिचा अर्थ, ज्या व्यक्तीला उक्त जागेचे भाडे मिळते किंवा अशी जागा भाड्याने दिली तर ज्या व्यक्तीला तिचे भाडे मिळण्याचा हक्क असेल अशी व्यक्ती, असा आहे व त्यामध्ये—

(एक) मालकाच्या वतीने असे भाडे घेणारा एजंट किंवा विश्वस्त,

(दोन) सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने उक्त जागेचा प्रभार घेण्यासाठी किंवा उक्त जागेच्या मालकाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी नेमलेला, प्रापक, समपहर्ता किंवा व्यवस्थापक, आणि

(तीन) कब्जेगहाणदार ;

यांचा समावेश होतो ;

(ठ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमान्वये विहित केलेले, असा आहे ;

(ड) " करयोग्य मूल्य " याचा अर्थ, संबंधित नगरपालिका कायद्याच्या तरतुदींनुसार निश्चित केलेले किंवा ठरलेले इमारतीचे किंवा तिच्या भागाचे करयोग्य मूल्य, वार्षिक मूल्य किंवा वार्षिक भाडे मूल्य, असा आहे ;

(ढ) " संबंधित नगरपालिका कायदा " याचा अर्थ,—

(एक) बृहन्मुंबईच्या संबंधात, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८१८, १८८८ चा मुंबई ३.

(दोन) पुणे, सोलापूर व कोल्हापूर या शहरांच्या संबंधात [१][आणि कलम १, पोट-कलम (३) च्या खंड (ब) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे हा अधिनियम ज्या क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये अंमलात आणण्यात आलेला आहे अशा क्षेत्रामधील किंवा क्षेत्रांमधील कोणत्याही अन्य शहरांच्या किंवा शहराच्या संबंधात] मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, १९४९ चा मुंबई ५९.

(तीन) नागपूर शहराच्या संबंधात, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

असा आहे.

(ण) " निवासी जागा " याचा अर्थ, राहण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी किंवा स्वतंत्र वापराचा उद्देश असलेली कोणतीही इमारत किंवा तिचा भाग, असा आहे ;

(त) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(थ) " कर " याचा अर्थ, या अधिनियमान्वये बसविण्यात येणारा कर, असा आहे ;

(द) " करपात्र जागा " याचा अर्थ, या अधिनियमान्वये ज्या जागेच्या बाबतीत कर बसविता येईल अशी इमारतीमधील निवासी जागा, असा आहे ;

(ध) " वर्ष " याचा अर्थ, वित्तीय वर्ष, असा आहे.

## कर बसवणे व कर आकारणे

विवक्षित इमारतींवर कर बसविणे व वसूल करणे.

**३.** (१) कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, महापालिका क्षेत्रात असलेली कोणतीही निवासी जागा,—

[२][(क) कलम १ च्या पोट-कलम (३), खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या महापालिकेच्या संबंधात १ एप्रिल १९७४ रोजी ; व

(ख) कलम १ च्या पोट-कलम (३), खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या महापालिकेच्या बाबतीत, उक्त खंड (ख) अन्वये ज्या वर्षी अधिसूचना काढण्यात आली असेल त्या वर्षाच्या १ एप्रिल रोजी ; सुरू होणाऱ्या प्रत्येक वर्षासाठी कर बसविण्यात येईल व तो वसूल करण्यात येईल.]

[३][(एक)] जर ती बृहन्मुंबई क्षेत्रात असेल व अशा जागेचे तलक्षेत्र १२५ चौरस मीटरपेक्षा अधिक असेल आणि तिचे करयोग्य मूल्य पंधराशे रुपयांपेक्षा अधिक असेल ;

---

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १७ याच्या कलम ३ (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ख) अन्वये " (अ) " आणि " (ब) " यांना नवीन क्रमांक व कंस समाविष्ट करण्यात आले.

[१][(दोन)] जर ती इतर महानगरपालिका क्षेत्रात असेल व अशा जागेचे तलक्षेत्र १५० चौरस मीटरपेक्षा अधिक असेल आणि तिचे करयोग्य मूल्य पंधराशे रुपयांपेक्षा अधिक असेल ;

(२) जी निवासी जागा बृहन्मुंबईत असून तिचे तलक्षेत्र १२५ चौरस मीटर किंवा त्यापेक्षा कमी असेल किंवा त्या निवासी जागेचे करयोग्य मूल्य पंधराशे रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा कोणत्याही निवासी जागेच्या बाबतीत आणि जी निवासी जागा इतर महानगरपालिका क्षेत्रात असेल व तिचे तलक्षेत्र १५० चौरस मीटर किंवा त्यापेक्षा कमी असेल किंवा तिचे करयोग्य मूल्य पंधराशे रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा कोणत्याही निवासी जागेच्या संबंधात, कोणताही कर बसवण्यात येता कामा नये.

(३) करपात्र निवासी जागांच्या बाबतीत अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये दिलेल्या क्षेत्रात त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये दिलेल्या दरांनी कर बसवण्यात व वसूल करण्यात येईल.

कराची प्रथमिक जबाबदारी.

**४.** (१) कोणत्याही इमारतीमधील ज्या निवासी जागेच्या बाबतीत कलम ३ अन्वये कर बसवता येईल अशा कोणत्याही निवासी जागेचा प्रत्यक्ष भोगवटादार त्या इमारतीचा मालक असेल तर, असा कर अशा प्रत्यक्ष भोगवटादारावर बसवण्यात येईल.

(२) इतर कोणत्याही बाबतीत, असा कर प्रथमतः पुढीलप्रमाणे वसूल केला पाहिजे, म्हणजेच---

(अ) जागा भाड्याने दिली असेल तर पट्टाकाराकडून ;

(ब) जागा पोटभाड्याने दिली असेल तर वरिष्ठ पट्टाकाराकडून.

अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस जागेच्या भोगवटादाराकडून कराची रक्कम वसूल करण्याचा हक्क असणे.

**५.** (१) कलम ४ च्या तरतुदीन्वये जिच्याकडून कर वसुलीयोग्य आहे अशा कोणत्याही व्यक्तीने इमारतीमधील कोणत्याही निवासी जागेच्या बाबतीत कर दिला तर, तिने ज्या कालावधीसाठी कर दिला असेल त्या कालावधीमध्ये ती स्वतः त्या जागेचा भोगवटा करीत नसेल तर तिला अशी जागा पूर्वोक्त कालावधीत प्रत्यक्ष जिच्या भोगवट्यात होती त्या व्यक्तीकडून, कराची रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

१९४७ चा मुंबई ५७.

(२) या कलमान्वये भोगवटादाराकडून करण्यात आलेली कराच्या कोणत्याही रकमेची वसुली ही, मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ यांच्या कलम ७ च्या किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या तत्सम कोणत्याही कायद्याच्या प्रयोजनार्थ वाढ असल्याचे मानण्यात येणार नाही.

कलम ५ अन्वये रकमेची वसुली करण्याचे अधिकार व उपाययोजना.

**६.** कलम ५ खाली कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, त्या रकमेच्या वसुलीच्या संबंधात, ती रक्कम तिला ज्या व्यक्तीकडून मिळण्याचा हक्क असेल त्या व्यक्तीकडून तिला जर भाड्याची रक्कम येणे असती तर त्याबाबतीत जे अधिकार असते तेच अधिकार याही बाबतीत असतील व त्याच उपाययोजना याही बाबतीत करता येतील.

आकारणी प्राधिकाऱ्यांची नेमणूक.

**७.** कर आकारणीच्या प्रयोजनार्थ, संबंधित महानगरपालिका आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशा महानगरपालिका अधिकाऱ्यांची, आकारणी प्राधिकारी म्हणून लेखी आदेशाद्वारे, नेमणूक करता येईल व त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा ठरवून देता येतील.

---

१. वरील अधिनियमांच्या कलम ४ (ख) अन्वये "(अ)" आणि "(ब)" यांना नवीन क्रमांक व कंस समाविष्ट करण्यात आले.

इमारतीमधील करपात्र जागांची यादी तयार करणे व ती ठेवणे.

८. (१) आकारणी प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत किंवा महानगरपालिका आयुक्त कोणत्याही प्रकरणी किंवा प्रकरणांच्या वर्गाच्या बाबतीत विनिर्दिष्ट करील अंशा आणखी मुदतीच्या आत प्रत्येक आकारणी प्राधिकाऱ्याने, करपात्र असलेल्या सर्व इमारतींची यादी, विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली पाहिजे, अशा यादीत, तीमधील करपात्र जागा व त्यांचे प्रमाणशीर करयोग्य मूल्य नमूद केले पाहिजे. या प्रयोजनासाठी, आकारणी प्राधिकाऱ्यास, कोणत्याही इमारतींची किंवा जागांची तपासणी करता येईल किंवा त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करता येईल.

(२) जेव्हा जेव्हा कोणतीही जागा संपूर्णतः किंवा अंशतः बांधल्यामुळे, तिच्यात फेरबदल केल्यामुळे, भर घातल्यामुळे किंवा तिचे बांधकाम पुन्हा केल्यामुळे किंवा लबाडीने, अभावितपणे किंवा चुकीने कोणतीही नोंद वगळली गेल्याने किंवा नको त्या नोंदींची भर घातली गेल्याने अशा यादीत, नोंदीची भर घालणे, नोंद वगळणे किंवा तीत फेरबदल करणे आवश्यक असल्याचे दिसून येईल तेव्हा तेव्हा, उक्त यादीत नोंदीची भर घालून, एखादी नोंद वगळून किंवा तिच्यात फेरबदल करून आकारणी प्राधिकाऱ्याने करपात्र जागांची यादी अद्ययावत ठेवली पाहिजे.

(३) आकारणी प्राधिकाऱ्यास, पोट-कलम (१) अन्वये करपात्र जागांची यादी तयार करून ती प्रसिद्ध करणे शक्य व्हावे यासाठी, प्रत्येक करपात्र जागेच्या मालकाने, नेमलेल्या दिवसापासून दोन महिन्यांच्या आत किंवा राज्य शासन स्वतः होऊन किंवा महानगरपालिकेने केलेल्या अर्जावरून त्या बाबतीत, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा आणखी कालावधीच्या आत, पुढील तपशील असलेले विवरण, आकारणी प्राधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजे,—

(एक) करपात्र जागा जेथे असेल ते ठिकाण व ती इमारत ;

(दोन) जागेचे तलक्षेत्र ;

(तीन) भाड्याने दिलेल्या जागेचे भाडे किंवा ती भाड्याने दिली तर जे वाजवी भाडे अपेक्षित असेल ते भाडे ;

(चार) जागेच्या मालकाचे नाव व त्याचा कायम पत्ता ;

(पाच) जागेच्या भोगवटादाराचे नाव व त्याचा कायम पत्ता, आणि

(सहा) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आकारणी प्राधिकाऱ्यास आवश्यक वाटेल असा इतर तपशील.

(४) पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे करपात्र जागांची यादी अद्ययावत ठेवणे आकारणी प्राधिकाऱ्यास शक्य व्हावे या प्रयोजनासाठी, या अधिनियमाखाली करपात्र असलेल्या किंवा कोणत्याही वेळी, करपात्र असण्याचे बंद झालेल्या जागेच्या प्रत्येक मालकाने यथास्थिती, या अधिनियमाखाली अशी जागा करपात्र झाल्यानंतर किंवा करपात्र असल्याचे बंद झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील असणारे विवरण, आकारणी प्राधिकऱ्याकडे सादर केले पाहिजे.

करपात्र जागांची आकारणी.

९. (१) कर आकारणीच्या प्रयोजनाकरिता, आकारणी अधिकाऱ्याने करपात्र जागांच्या यादीत समाविष्ट असलेल्या तपशिलावर आधारलेली एक आकारणी यादी प्रत्येक इमारतीबाबत स्वतंत्रपणे तयार केली पाहिजे.

(२) नेमलेल्या दिवसांनंतर पहिल्यावेळी तयार करावयाची आकारणी यादी ही, सर्वसाधारणपणे नेमलेल्या दिवसापासून एक वर्षामध्ये (किंवा राज्य शासन एकतर स्वतः होऊन किंवा महानगरपालिकेने अर्ज केल्यानंतर **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा अधिक मुदतीत) तयार केली पाहिजे ; आणि नंतरची अशी प्रत्येक यादी ज्या वर्षाशी ती संबंधित असेल त्या वर्षाच्या ३० जूनपूर्वी (किंवा राज्य शासन एकतर स्वतः होऊन किंवा महानगरपालिकेने अर्ज केल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा नंतरच्या तारखेपूर्वी) तयार केली पाहिजे.

(३) पोट-कलम (२) अन्वये आकारणी यादी तयार केल्यानंतर, करपात्र जागांच्या यादीतून कोणतीही नोंद वगळण्यात आली, बदलण्यात आली किंवा तीत भर घालण्यात आली आणि अशा वगळण्यामुळे, बदलामुळे किंवा भर टाकल्यामुळे आकारणी यादीमध्ये कोणताही फेरबदल करणे आवश्यक झाले असेल त्याबाबतीत, आकारणी प्राधिकाऱ्याने अशा फेरबदलांची यादी तयार केली पाहिजे.

आकारणी यादी व फेरबदलांची यादी प्रसिद्ध करणे.

**१०.** (१) कलम ९ खाली आकारणी यादी किंवा फेरबदलांची यादी तयार केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, आकारणी प्राधिकाऱ्याने, त्यासंबंधीची आणि अशा यादीची प्रत जेथे तपासता येईल त्या जागेसंबंधीची नोटीस विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि या यादीत समाविष्ट असलेल्या जागेचा मालक किंवा भोगवटादार असल्याचा दावा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आणि अशा व्यक्तीच्या कोणत्याही एजंटास कोणताही आकार न देता, यादी तपासण्याची व तिच्यातून उतारे घेण्याची मुभा राहील.

(२) पोट-कलम (१) खाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रत्येक नोटिशीमध्ये, ज्या तारखेपूर्वी आकारणी यादी किंवा फेरबदलांच्या यादीबाबत आक्षेप सादर करता येतील ती दिनांक निर्दिष्ट केली पाहिजे ; अशी दिनांक ही, नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आतील व तीस दिवसांच्या नंतरची असता कामा नये.

(३) मालकाने किंवा भोगवटादाराने नोटिशीमध्ये निश्चित करण्यात आलेल्या वेळेपूर्वी लेखी अर्ज करून, आकारणी यादीबाबतचे किंवा फेरबदलांच्या यादीबाबतचे आक्षेप, ज्या कारणास्तव आकारणीच्या किंवा फेरबदलांच्या यादीबद्दल वाद असेल ती कारणे नमूद करून आकारणी प्राधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजेत. अशा रीतीने केलेल्या सर्व अर्जांची नोंद, त्या प्रयोजनासाठी आकारणी प्राधिकाऱ्याने ठेवावयाच्या एका नोंदवहीत केली पाहिजे.

(४) पोट-कलम (२) खालील नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतर, आकारणी प्राधिकाऱ्याने आक्षेप घेणाऱ्यास, जातीने किंवा एजंटाकरवी, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या आक्षेपांची चौकशी करून ते निकालात काढले पाहिजेत आणि पोट-कलम (३) खाली ठेवलेल्या नोंदवहीत त्यांचा निकाल नमूद करण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि अशा निकालानुसार आकारणी यादीत किंवा यथास्थिती, फेरबदलांच्या यादीत जी सुधारणा करणे आवश्यक असेल अशी कोणतीही सुधारणा करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(५) पोट-कलम (४) खाली अंतिमरीत्या तयार करण्यात आलेली आकारणी यादी किंवा यथास्थिती, फेरबदलांची यादी, आकारणी प्राधिकाऱ्याने त्याच्या सही-शिक्क्यानिशी अधिप्रमाणित

केली पाहिजे आणि आकारणी प्राधिकाऱ्याने त्यावर असे प्रमाणपत्र पृष्ठांकित केले पाहिजे की, याद्यांमध्ये ज्या बाबतीत सुधारणा करण्यात आल्या आहेत त्या बाबी सोडून आकारणी यादी किंवा यथास्थिती, फेरबदलांची यादी याबाबत कोणताही कायदेशीर आक्षेप घेण्यात आलेला नाही.

(६) आकारणी प्राधिकाऱ्याने, पोट-कलम (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अधिप्रमाणित केलेली यादी त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध केली पाहिजे व तिची एक प्रत यादीनुसार कराची वसुली करण्यासाठी वसुली प्राधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.

अपील. **११.** (१) आकारणी यादीच्या किंवा फेरबदलांच्या यादीच्या संबंधातील अपिलांची सुनावणी करण्याच्या प्रयोजनासाठी, महानगरपालिका आयुक्तास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांपैकी त्यास योग्य वाटतील एवढे अधिकारी अपील प्राधिकारी म्हणून नेमता येतील आणि त्याने त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा ठरवून दिल्या पाहिजेत.

(२) आकारणी प्राधिकाऱ्याने आकारणी केलेल्या काराच्या रकमेबाबत आक्षेप घेणाऱ्या किंवा अशी आकारणी केलेला कर भरण्याची जबाबदारी नाकारणाऱ्या कोणत्याही करपात्र व्यक्तीस अशा आकारणीविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल :

परंतु, कर भरलेला असल्याशिवाय असे कोणतेही अपील करता येणार नाही.

(३) अपिलाचे ज्ञापन विहित केलेल्या नमुन्यात असले पाहिजे आणि विहित केलेल्या रीतीने ते सत्यापित केले पाहिजे.

(४) आकारणी केलेला कर भरण्यासंबंधीचे बिल सादर केल्यानंतरच्या लगतच्या पंधरा दिवसांच्या आत अपील सादर केले पाहिजे, परंतु उक्त मुदतीत अपील सादर न करण्यास अपीलकाराला पुरेसे कारण होते याविषयी अपील प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, त्याला, उक्त मुदत संपल्यानंतरही अपील दाखल करून घेता येईल.

(५) अपील प्राधिकाऱ्याने अपिलाच्या सुनावणीसाठी दिवस व ठिकाण निश्चित केले पाहिजे आणि त्याला, सुनावणी वेळोवेळी स्थगित करता येईल आणि त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करता येईल किंवा करविता येईल. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, आकारणी प्राधिकाऱ्यासदेखील आपले म्हणणे मांडता येईल.

(६) अपील निकालात काढताना, अपील प्राधिकाऱ्यास,—

(क) आकारणी कायम करता येईल, कमी करता येईल, वाढविता येईल किंवा ती रद्द करता येईल, किंवा

(ख) आकारणी रद्द करता येईल, आणि निदेश देण्यात येईल त्याप्रमाणे आणखी चौकशी करून नव्याने आकारणी करण्याबद्दल आकारणी प्राधिकाऱ्यास निदेश देता येईल.

(७) अपील प्राधिकाऱ्याने, अपिलाची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर, आपले आदेश अपील करणाऱ्यास व आकारणी प्राधिकाऱ्यास कळविले पाहिजेत.

(८) अपील प्राधिकाऱ्याने दिलेले आदेश अंतिम असतील व त्याबाबत कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

(९) अपील प्राधिकाऱ्याने आकारणीमध्ये वाढ केली असेल त्या बाबतीत, आकारणी प्राधिकाऱ्याने, अपीलकाराने द्यावयाची जादा रक्कम विनिर्दिष्ट करणारा आदेश दिला पाहिजे, आणि उक्त रकमेची वसुली करण्यासाठी त्याची एक प्रत वसुली प्राधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.

## कर वसुली

कर, इत्यादी वसूल करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी.

**१२.** (१) महानगरपालिकेने हा कर वसूल केला पाहिजे.

(२) या अधिनियमाखालील कर (कोणतीही शास्ती धरून) संबंधित महानगरपालिका कायद्याखाली त्या क्षेत्रात ज्या रीतीने मालमत्ता कर वसूल करण्यात येतो त्या रीतीने वसूल केला पाहिजे :

परंतु, कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रात, महानगरपालिकेकडून मालमत्ता कर बसवण्यात येत नसेल तर, हा कर विहित करण्यात येईल अशा रीतीने वसूल केला पाहिजे.

(३) कोणत्याही महानगरपालिकेच्या वतीने या अधिनियमाखालील कर गोळा करण्याचे व शास्तीदाखलची रक्कम वसूल करण्याचे काम हे संबंधित महानगरपालिका कायद्याखाली अशा महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कर गोळा करण्यासाठी नेमलेल्या योग्य त्या महानगरपालिका प्राधिकाऱ्याने केले पाहिजे.

(४) कर गोळा करण्याच्या खर्चाबाबत महानगरपालिकेस, विहित करण्यात येईल असा वटाव मिळण्याचा हक्क असेल आणि निरनिराळ्या महानगरपालिका क्षेत्रांसाठी वटावाच्या निरनिराळ्या दरांची तरतूद करता येईल.

ज्या इमारतींच्या संबंधात कर बसविता येईल त्या इमारतींवर कर हा भार म्हणून असणे.

**१३.** कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, आणि कोणत्याही संविदेतून किंवा अन्य प्रकारे कोणतेही अधिकार उद्‌भवत असले तरी, राज्य शासनास देय असणारा जमीन महसूल असल्यास तो जमीन महसूल प्रथम देण्यात येईल या शर्तीस अधीन राहून, कोणत्याही करपात्र जागेच्या बाबतीत, कर किंवा शास्ती म्हणून देय असणाऱ्या सर्व रकमा या,—

(क) शासनाकडून प्रत्यक्ष धारण करण्यात आलेल्या कोणत्याही जागेच्या बाबतीत, अशा करास किंवा शास्तीस पात्र असणाऱ्या व्यक्तींच्या अशा जागेमधील हितसंबंधावर आणि अशा जागेत आढळून आलेल्या मालावर आणि इतर जंगम मालमत्तेवर, तसा माल किंवा मालमत्ता असल्यास, आणि

(ख) इतर कोणत्याही जागांच्या बाबतीत, अशा जागांवर आणि अशा जागांत आढळून आलेल्या कोणत्याही मालांवर आणि इतर जंगम मालमत्तेवर

भार म्हणून राहतील.

वसूल केलेली कराची रक्कम राज्य शासनाकडे जमा करणे आणि वसुली प्राधिकाऱ्याने कर वसुलीचे विवरण सादर करणे.

**१४.** (१) कर आणि शास्ती असल्यास, ती वसूल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत, अशा रीतीने वसूल केलेली रक्कम वेळोवेळी, महानगरपालिका आयुक्ताने राज्य शासनाला दिली पाहिजे.

(२) कर आणि शास्ती असल्यास, त्यांचे लगतपूर्वीच्या पोट-कलमाखाली वसूल करण्यात आलेले व राज्य शासनाकडे भरण्यात आलेले उत्पन्न राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा केले पाहिजे.

(३) प्रत्येक वर्ष संपल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत महानगरपालिका आयुक्ताने त्या वर्षासंबंधी आकारणी प्राधिकाऱ्याकडून आकारणी करण्यात आलेल्या कराची एकूण रक्कम आणि वसुली प्राधिकाऱ्याने त्या वर्षी वसूल केलेली, अशा आकारणी केलेल्या कराची आणि शास्तीची रक्कम असल्यास, त्या शास्तीची एकूण रक्कम दर्शविणारे विवरण राज्य शासनाकडे सादर केले पाहिजे.

कर वसूल करण्यात महानगरपालिकेने केलेली कसूर.

**१५.** (१) कोणत्याही महानगरपालिकेने या अधिनियमाखालील कराच्या बाबतीत देय असलेल्या कोणत्याही रकमेची वसुली करण्यात किंवा ती राज्य शासनाला देण्यात कसूर केल्यास राज्य शासनाला,त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा रकमेच्या वसुलीसाठी किंवा ती देण्यासाठी मुदत निश्चित करता येईल.

(२) अशा रीतीने निश्चित केलेल्या मुदतीत रकमेची वसुली केली गेली नाही किंवा ती देण्यात आली नाही तर, राज्य शासनाला, अशा महानगरपालिकेकडे निहित असलेल्या निधीसंबंधातील कोणत्याही, कायद्यात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बँकेत महानगरपालिकेचा कोणताही पैसा ठेव म्हणून ठेवण्यात आला असेल अशा कोणत्याही बँकेत किंवा अशा महानगरपालिकेचा कोणताही पैसा ठेव म्हणून ठेवण्यात येत असेल अशा सरकारी कोषागाराच्या किंवा कोणत्याही सुरक्षा स्थानाच्या प्रभारी व्यक्तीस, अशा बँकेत किंवा अशा व्यक्तीच्या हाती असलेल्या, महानगरपालिकेच्या खात्यातील जमा पैशातून किंवा यथास्थिती, अशा बँकेस किंवा व्यक्तीस ठेवीच्या रूपाने महानगरपालिकेकडून किंवा तिच्या वतीने वेळोवेळी मिळतील अशा रकमांतून अशी रक्कम देण्यासंबंधी निदेश देता येईल, अशा बँकेस किंवा व्यक्तीस असे आदेश पाळणे बंधनकारक असेल.

(३) पोट-कलम (२) खालील आदेशानुसार करण्यात आलेल्या प्रत्येक प्रदानामुळे, बँकेने किंवा, व्यक्तीने अशा रीतीने अशा बँकेमध्ये किंवा त्या व्यक्तीकडे जमा केलेल्या त्या महानगरपालिकेच्या पैशातून, अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमांसंबंधात, महानगरपालिकेप्रत असलेल्या सर्व दायित्वातून अशा बँकेची किंवा व्यक्तीची पुरेशी ऋणमुक्तता होईल.

## संकीर्ण

प्रवेश तपासणी वगैरे करण्याचा अधिकार.

**१६.** आकारणी प्राधिकाऱ्यास किंवा अपील प्राधिकाऱ्यास किंवा यापैकी कोणत्याही प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास रीतसर नोटीस दिल्यानंतर, सूर्योदय आणि सूर्यास्त यामधील कोणत्याही वेळी, कोणत्याही करपात्र जागेसंबंधातील तपशील गोळा करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा त्या जागेची मोजमापे घेण्यासाठी त्या जागेमध्ये प्रवेश करता येईल आणि त्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास किंवा इतर कोणत्याही प्रभारी व्यक्तीस त्या जागेमध्ये ठेवण्यात आलेले कोणतेही पुस्तक, नोंदवही किंवा अभिलेख तपासणीसाठी सादर करण्यास फर्मावता येईल आणि कर आकारणीच्या प्रयोजनासाठी करपात्र जागेसंबंधातील कोणतीही माहिती विचारता येईल आणि जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास किंवा प्रभारी व्यक्तीस, मोजमापे घेण्यासाठी किंवा अशा तपासणीसाठी सोयी उपलब्ध करून देणे आणि त्याच्याजवळ उपलब्ध असेल अशी माहिती देणे बंधकारक असेल.

१७. (१) कोणत्याही करपात्र व्यक्तीने आकारणी प्राधिकाऱ्याची अशी खात्री करून दिली की, तिने दिलेली कराची रक्कम, या अधिनियमाखाली जी रक्कम तिच्याकडून रीतसर आकारण्याजोगी असेल त्या रकमेपेक्षा अधिक आहे तर, अशा करपात्र व्यक्तीस आकारणी प्राधिकाऱ्यांकडून अशा कोणत्याही जादा रकमेचा परतावा मिळण्याचा हक्क असेल. परतावे.

(२) आपल्या अपीलविषयक अधिकारांचा वापर करताना, अपील प्राधिकाऱ्यास एखादी रक्कम चुकीने भरण्यात आल्याचे किंवा जादा भरण्यात आल्याचे आढळून आल्यास त्याने ती रक्कम आकारणी प्राधिकाऱ्याकडून परत केली जाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१८. कलम १७ खालील कारचा कोणताही परतावा मिळण्यासंबंधीचा कोणताही दावा, करपात्र व्यक्तीने कर दिल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत किंवा अपील दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत, अपिलातील आदेश मिळाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत करण्यात आलेला नसेल तर, दाखल करून घेण्यात येणार नाही. परताव्यासाठी करावयाच्या मागण्यांची मुदत.

१९. (१) कलम १२ च्या तरतुदीनुसार, कर वसुलीसंबंधीची मागणीची नोटीस बजावण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने नोटिशीत नमूद केलेल्या मुदतीत तिच्याकडून कराबद्दल देय असलेली कोणतीही रक्कम देण्यात कसूर केली तर, अशा व्यक्तीने कर भरण्यात बुद्धिपुरस्सर कसूर केली आहे याबद्दल खात्री झाल्यानंतर महानगरपालिका आयुक्तास, राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, तिच्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेशिवाय अशा रीतीने न भरलेल्या कराच्या रकमेच्या एक-दशांशापेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेची शास्ती लादता येईल व तिच्याकडून वसूल करता येईल. कर भरण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

(२) या कलमाखाली वसूल करण्याजोग्या रकमा, कलम १२ मध्ये कर वसूल करण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने, वसूल केल्या जातील.

२०. (१) कोणत्याही व्यक्तीने वाजवी कारणाशिवाय, कलम ८ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही विवरण, आकारणी प्राधिकाऱ्याकडे देण्यात कसूर केल्यास, आकारणी प्राधिकारी कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतकी रक्कम शास्ती म्हणून लादू शकेल. विवरण देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

(२) पोट-कलम (१) खाली लादण्यात आलेली शास्तीदाखलची रक्कम ही, कलम १२ पोट-कलम (२) खाली ज्या प्रकारे कर आणि शास्तीची रक्कम वसूल करण्यात येते त्याच प्रकारे वसूल करता येईल.

२१. जर कलम ८, पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) खाली देण्यात आलेल्या विवरणात कोणतीही व्यक्ती असे कोणतेही निवेदन करील, किंवा कलम १६ खाली अशी माहिती पुरवील की जी खोटी असेल किंवा जी एकतर खोटी असल्याचे तिला माहीत असेल किंवा जी खोटी असल्याचे तिला सकारण वाटत असेल किंवा जी माहिती ती खरी मानत नसेल तर, तिला अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कैदेची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील. खोटी निवेदने, वगैरे करण्याचा अपराध.

अडथळा आणल्याबद्दल शिक्षा.

**२२.** कोणतीही व्यक्ती आकारणी प्राधिकाऱ्यास किंवा अपील प्राधिकाऱ्यास किंवा त्या प्राधिकाऱ्यापैकी कोणत्याही प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कलम १६ खालील आपली कर्तव्य पार पाडण्यास अडथळा आणील तर, तिला अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्याही प्रकारच्या कैदेची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**२३.** (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीकडून झाला असेल त्याबाबतीत, अपराध झाला तेव्हा जी व्यक्ती कंपनीचा कारभार चालविण्यासाठी कंपनीची प्रभारी होती आणि कंपनीच्या कारभारासाठी कंपनीस जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी देखील अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्यावर खटला भरला जाण्यास आणि त्याप्रमाणे शिक्षा होण्यास ती पात्र ठरेल :

परंतु, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे जर, अशी व्यक्ती असे सिद्ध करील की, तिच्या नकळत असा अपराध झाला आहे किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्व दक्षता घेतली होती तर, या अधिनियमात तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही शिक्षेस अशी कोणतीही व्यक्ती पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि असा अपराध कोणत्याही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा त्याच्या कोणत्याही हयगयीमुळे झाला आहे असे सिद्ध करण्यात आल्यास, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याच्यावर खटला भरला जाण्यास व त्याचप्रमाणे शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, एखादा निगम निकाय, असा आहे आणि त्यामध्ये, भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तीच्या इतर संघांचा समावेश होतो ;

(ख) भागीदारी संस्थेच्या संबंधात, " संचालक " याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

विवक्षित इमारतींना कर देण्यातून सूट देणे.

**२४.** पुढील इमारतींना कर देण्यातून सूट देण्यात येईल, त्या इमारती अशा,—

(क) केंद्र किंवा राज्य शासन यांच्याकडे निहित असलेल्या किंवा त्यांच्या मालकीच्या इमारती,

(ख) इतर कोणत्याही राज्य शासनाकडे निहित असलेल्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या असलेल्या आणि केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या आणि फायद्याच्या प्रयोजनासाठी वापरल्या न जाणाऱ्या किंवा वापरावयाचा हेतू नसलेल्या इमारती,

(ग) मुंबई बंदर विश्वस्त मंडळाकडे निहित असलेल्या आणि फायद्याच्या प्रयोजनासाठी वापरल्या न जाणाऱ्या किंवा वापरावयाचा हेतू नसलेल्या इमारती,

(घ) परराष्ट्रांच्या कोणत्याही वृत्तिक वाणिज्यदूताकडे, मग त्याला महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्य एजंट, प्रो कॉन्सील किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो—निहित असलेल्या किंवा त्यांच्या भोगवट्यात असलेल्या किंवा अशा अधिकाऱ्यांच्या

कर्मचारीवर्गातील (भारताचे नागरिक नाहीत अशा) कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या भोगवट्यात असलेल्या आणि अशा इमारती किंवा भाग निवासाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येत असतील किंवा वापरण्याचा हेतू असेल आणि फायद्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येत नसतील किंवा वापरण्याचा हेतू नसेल अशा इमारती किंवा त्यांचे भाग.

**२५.** शंकाचे निरसन व्हावे म्हणून याद्वारे, असे जाहीर करण्यात येते आहे की, या अधिनियमाच्या तरतुदी स्थावर मालमत्तेवर कर बसविण्याची तरतूद करणाऱ्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या जोडीने असतील.

या अधिनियमाखालील कर हा इतर करांच्या जोडीने असणे.

**२६.** (१) राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमान्वये नियम करण्याच्या अधिकारांचा वापर केला पाहिजे. मात्र अशा अधिकारांचा प्रथमतः वापर करण्याचा प्रसंग वगळता, तो पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असेल.

नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता, राज्य शासनाला सामान्यतः या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता या अधिनियमांशी सुसंगत असे नियम करता येतील. अशा नियमांत ज्यासाठी या अधिनियमात तरतूद करण्यात आलेली नसेल अशा या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी फी देण्याची तरतूद करता येईल.

(३) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल. आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल. ते अधिवेशन किंवा त्याच्या लगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोनही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## संक्रमणकालीन व विशेष तरतुदी

१९७४ चा महा. १९. **२७.** महाराष्ट्र निवसी जागांवरील कर अधिनियम, १९७४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "निरसित अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा निरसित होईल.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १९ यांचे निरसन.

**२८.** (१) नेमलेल्या दिवसानंतर, शक्य तितक्या लवकर, आकारणी प्राधिकाऱ्याने, १ एप्रिल १९७९ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ मार्च १९८० रोजी समाप्त होणाऱ्या वर्षासाठी, कलम ८ अन्वये करपात्र जागांची यादी आणि कलम ९ आणि १० अन्वये आकारणी यादी तयार केली पाहिजे आणि या अधिनियमाच्या तरतुदींनुसार त्या वर्षासाठी कर बसविण्याची व तो वसूल करण्याची पुढील कार्यवाही केली पाहिजे किंवा करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

करपात्र जागांची यादी व कर आकारणी यादी तयार करणे आणि १९७४-७९ या कालावधीचा कर वसूल करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या करपात्र जागांच्या यादीच्या व आकारणी यादीच्या आधारे, आकारणी प्राधिकाऱ्याने, त्यानंतर, १ एप्रिल, १९७४ ला सुरू होणाऱ्या व ३१ मार्च १९७९ ला संपणाऱ्या कालावधीसाठी करपात्र जागांची यादी आणि आकारणी यादी तयार केली पाहिजे, अशा याद्या, आकारणी प्राधिकारी ठरवील त्याप्रमाणे, प्रत्येक वर्षासाठी किंवा दोन अथवा अधिक वर्षासाठी वेगवेगळ्या तयार करता येतील. कलमे ८, ९, १० आणि ११ यांच्या तरतुदी आणि अन्य संबंधित कलमे आणि त्याखाली करण्यात आलेले नियम, योग्य त्या फेरफारांसह अशा याद्या तयार करण्याच्या संबंधात आणि त्यांना अंतिम रूप देण्याच्या संबंधात लागू होतील.

(३) १ एप्रिल, १९७४ ते ३१ मार्च, १९७९ या कालावधीसाठी आकारणी यादी किंवा याद्या तयार करण्यात व त्यांना अंतिम रूप देण्यात आल्यानंतर वसुली प्राधिकाऱ्याने करपात्र जागांच्या संबंधात बिले तयार करण्याची आणि अशी बिले, कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तींना देण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि या अधिनियमाच्या तरतुदींनुसार संबंधित वर्षासाठी किंवा वर्षांसाठी कर बसविण्याची व ते वसूल करण्याची पुढील कार्यवाही केली पाहिजे किंवा पुढील कार्यवाही करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(४) वेगवेगळ्या जागांसाठी वेगवेगळी बिले तयार करता येतील. निरनिराळ्या वर्षासाठी वेगवेगळी किंवा एकत्रित बिले तयार करता येतील. अशा प्रत्येक बिलामध्ये, ज्या निवासी जागेच्या संबंधात कर येणे आहे ती निवासी जागा, ज्या कालावधीच्या संबंधात कर येणे आहे तो कालावधी किंवा ते कालावधी, जागेचे करयोग्य मूल्य, त्या संबंधात आकारण्यात आलेल्या कराची रक्कम, निरसित अधिनियमान्वये करपात्र व्यक्तीने दिलेली रक्कम (तशी रक्कम असल्यास) आणि यथास्थिति, तिने देय असलेली शिल्लक रक्कम किंवा तिला देय असलेली परताव्याची रक्कम या गोष्टी विनिर्दिष्ट केल्या पाहिजेत.

या अधिनियमान्वये करपात्र नसणाऱ्या व्यक्तींना निरसित अधिनियमान्वये दिलेली रक्कम परत करणे.

**२९.** निरसित अधिनियमान्वये जिने कोणतीही रक्कम दिलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र नाही असे वसुली प्राधिकाऱ्यास आढळून आल्यास, वसुली प्राधिकाऱ्याने शक्य तितक्या लवकर, अशा व्यक्तीला निरसित अधिनियमान्वये दिलेली रक्कम परत करण्याचा आदेश दिला पाहिजे.

बिल किंवा परतावा आदेश बरोबर नसल्यास त्यात सुधारणा करण्याची तरतूद.

**३०.** (१) जर कोणत्याही व्यक्तीने, कलम २८ अन्वये तिला दिलेल्या कोणत्याही बिलानुसार तिने देय असलेली शिल्लक रक्कम किंवा तिला देय असलेली परताव्याची रक्कम किंवा कलम २९ अन्वये तिला देय असलेली परताव्याची रक्कम, बरोबर नाही असा दावा केला तर, तिला वसुली प्राधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज करता येईल आणि या अर्जात तिच्या हिशोबानुसार असलेली बिनचूक रक्कम नमूद केली पाहिजे आणि त्याच्या पुष्ट्यर्थ, निरसित अधिनियमान्वये तिने दिलेल्या रकमेच्या संबंधातील बिले व पावत्या जोडल्या पाहिजेत.

(२) असा कोणताही अर्ज मिळाल्यावर, वसुली प्राधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि अर्जदारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, एकतर आधीच दिलेले बिल कायम करता येईल किंवा बिलामध्ये किंवा परतावा आदेशामध्ये सुधारणा करून यथास्थिति सुधारित बिल किंवा परतावा आदेश देता येईल.

## अनुसूची

(कलम ३ पहा)

| | क्षेत्र<br>(१) | कराचा दर<br>(२) |
|---|---|---|
| एक. | बृहन्मुंबई.---निवासी जागेचे तलक्षेत्र १२५ चौरस मीटरपेक्षा अधिक असेल आणि करयोग्य मूल्य पंधराशे रुपयांपेक्षा अधिक असेल तेथे. | निवासी जागेच्या करयोग्य मूल्याच्या दहा टक्के. |
| दोन. | इतर महानगरपालिका क्षेत्रांच्या हद्दीत.—निवासी जागेचे तलक्षेत्र १५० चौरस मीटरपेक्षा अधिक असेल आणि करयोग्य मूल्य पंधराशे रुपयांपेक्षा अधिक असेल तेथे. | निवासी जागेच्या करयोग्य मूल्याच्या दहा टक्के. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई